वाचले -

१) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६

२) एकत्रिकृत विकास नियत्रण व प्रोत्साहन नियमावली दि. २/१२/२०२०

३) मा. अवर सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.२/०८/२०२१ चे पत्र

४) मा. आयुक्त यांचे कडील दि. २६/१०/२०२१ चा मान्य प्रस्ताव

**************************************************************************************************

स्थापना २१/१०/८२ पिंपरी-४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८, अग्निशामक विभाग
क्र. अग्नि/४/ कावि/ ६०१ /२०२१
दि. २६/१०/२०२१

विषय : उंच इमारतीं व अन्य उद्योगधंदे व्यवसायकरीता अग्निशमन सेवा शुल्क सुधारित दर निश्चिती बाबत.

आदेश,

मा. अवर सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र. टिपीएस -१८२१/प्र.क्र.१०३ /२०२१/नवि-१३,दि.२/०८/२०२१ अन्वये, " मंजूर एकत्रिकृत विकास नियत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम २.२.१४ (ii) मधील तरतुदीनुसार फायर इन्फ्रास्ट्रक्चर चार्जेसची आकारणी वेगळयाने करण्याची आवश्यकता नाही, मात्र महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसुरक्षा अधिनियम, २००६ मधील तरतुदींनुसार आवश्यक ती फी / शुक्ल आकारणी करण्यात यावी व त्याचा विनियोग सदर अधिनियमातील तरतुदींनुसार करणेत यावा" असे आदेश शासनाकडुन प्राप्त झाले आहेत.

" एकत्रिकृत विकास नियत्रण व प्रोत्साहन नियमावली " मधील नियम, " महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ " आणि " राष्ट्रीय इमारत संहिता २०१६ " मधील सूचना यांचे अनुषंगाने पिंपरी चिंचवड शहरातील उंच इमारतींना तसेच विशेष वापराच्या इमारतींना आग प्रतिबंधक उपाययोजनांच्या दृष्टीने करावयाच्या यंत्रणेसाठी अग्निशामक विभागाकडून प्राथमिक व अंतिम ना हरकत प्रमाणपत्र दिले जातात. अशा इमारतींमध्ये निवासी, बिगर निवासी, वाणिज्य-मिश्र बांधकामाकरिता तसेच हॉटेल्स, पेट्रोलपंप, धोकादायक गोदामे, कंपनी, कारखाने, रुग्णालये इत्यादींचा समावेश आहे.

अग्निशमन सेवा हि अत्यावश्यक स्वरुपाची सेवा असून, ती नागरीकांना सक्षम व प्रभावीपणे पुरविणे हे " महानगरपालिकेचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ " नुसार कर्तव्य आहे. सदरची सेवा पुरविणेसाठी केंद्रांची उभारणी, वाहने, उपकरणे यांची खरेदी, विशेष वापराची (स्पेशल पर्पज) वाहने-उपकरणे यांची उपलब्धता, त्याची नियमित देखभाल दुरुस्ती यांची व्यवस्था, प्रशिक्षित असा सेवकवर्ग नेमणे, त्यांचे वेतन, गणवेश व तदनुषंगिक सुविधा पुरविणे, त्याकरीता आर्थिक तरतूद आवश्यक असते.

सबब, मी. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी – १८ मला प्राप्त अधिकारानुसार अग्निशमन सेवा शुल्कासह महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ चे कलम ११ मध्ये नमूद अग्निशामक ना हरकत दाखला देणेकामी अग्निशमन सेवा शुल्काचे यापुर्वीचे प्रचलित दरांमध्ये पुणे मनपा प्रमाणे सुधारणा करुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकाकडुन यापुर्वी इमारत बांधकामांना "अग्निशमन सेवा शुल्क " ऐवजी " फायर प्रिमियम चार्जेस " च्या सुधारित दरांचा तक्ता " परिशिष्ट - अ " आणि " अग्निशमन सेवा शुल्क " च्या (फायर ऍक्ट नुसार) सुधारित दरांचा तक्ता " परिशिष्ट–ब " प्रमाणे व उद्योगधंदे व्यवसाय व अन्य सेवा करीता नविन / नुतनिकरण अग्निशमन ना हरकत दाखला अग्निशमन सेवा शुल्काचा सुधारित दरांचा तक्ता परिशिष्ठ " क " नूसार नव्याने दर हे आदेशाचे दिनांका पासुन लागू करणेत येत आहे. तथापी, अग्निशमन सेवा शुल्काचे निश्चित केलेल्या दरांमध्ये भविष्यात पुढे शासन मान्यता प्राप्त होताना घट झाल्यास, जादा झालेली रक्कम संबंधित विकसकास त्याच अथवा अन्य बांधकाम अग्निशामक ना हरकत दाखला प्रकरणी भरावयाच्या रकमेमध्ये समायोजित करणेत येईल. तसेच शुल्कात वाढ झालेस, सदरचे शुल्क संबंधिताकडुन नियमानूसार व्याजासह वसुली अनुज्ञेय राहील.

२६/१०/२१

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

# परिशिष्ट – "अ"

(१५ मी. उंचीवरील व ५०० चौ. मी किमान क्षेत्रफळ)

| १ | २ | ३ |
|---|---|---|
| अ.क्र. | फायर प्रिमियम चार्जेस ची आकारणी करायचा इमारत उंचीचा टप्पा | फायर प्रिमियम चार्जेस चे सुधारित दर |
| १ | १५ मी. उंचीपर्यंतच्या विशेष वापराच्या विविध प्रकारच्या भोगवटा असणाऱ्या इमारती.<br>अ ) ५०० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळ असणाऱ्या इमारती. | अ) रु.५०/- प्रती चौ.मी.<br>( किमान रु.५०,०००/- ) |
| २ | १५ मी. ते ४० मी. उंचीच्या इमारती | रु.२००/- प्रती चौ.मी.<br>( किमान रु.२,००,०००/- ) |
| ३ | ४० मी. ते ७० मी. उंचीच्या इमारती | रु.५००/- प्रती चौ.मी.<br>( किमान रु.५,००,०००/- ) |
| ४ | ७० मी. ते १०० मी. उंचीच्या इमारती | रु.८००/- प्रती चौ.मी.<br>( किमान रु.८,००,०००/- ) |
| ५ | १०० मी. ते १५० मी. उंचीच्या इमारती | रु.१,०००/- प्रती चौ.मी.<br>( किमान रु.१५,००,०००/- ) |
| ६ | १५० मी. पेक्षा जास्त उंचीच्या इमारती | रु.१,२००/- प्रती चौ.मी.<br>( किमान रु.२०,००,०००/- ) |

* वरीलप्रमाणे रकाना ३ मध्ये नमूद करण्यात आलेले सुधारित दर हे रकाना २ मध्ये नमूद उंचीच्या टप्प्यातील इमारतीच्या संपूर्ण बांधीव (Gross Builtup )क्षेत्रासाठी लागू होतील.

28/10/21

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

# परिशिष्ठ " ब "

[ कलम ३ ( १ ) स्पष्टीकरण व कलम ११ ( १) पहा ] भाग - एक
(१५ मी व त्यावरील उंच व ५०० चौ. मी. क्षेत्रफळ )

| अ.क्र. | इमारतीचा भोगवट्याचा प्रकार | १० ते २५ लाखा लोकसंख्या नसलेली महानगरपालिका | |
|---|---|---|---|
| | | फी प्रति चौ. मी.रुपये | किमान ...... रुपयांच्या अधीन |
| | निवासी इमारती (मिश्र) निवासी/ लॉजींग/ हॉटेल | | |
| १ | ० ते २४ मीटर उंचीच्या पर्यंत | ४०.०० | १,००,०००/- |
| २ | २४ ते ३५ मीटर उंचीच्या पर्यंत | ६०.०० | २,००,०००/- |
| ३ | ३५ ते ४५ मीटर उंचीच्या पर्यंत | ८०.०० | ३,००,०००/- |
| ४ | ४५ मीटर पेक्षाअधिक उंचीच्या | १००.०० | ५,००,०००/- |
| | हॉटेल्स ( क-५) | | |
| १ | १५ ते ३० मीटर उंचीच्या पर्यंत | ५०.०० | १,५०,०००/- |
| २ | ३० मीटर वरील उंचीच्या | ७५.०० | ३,००,०००/- |
| | शैक्षणिक इमारती ( ख) | | |
| १ | १५ ते ३० मीटर उंचीच्या पर्यंत | ८०.०० | ४,००,०००/- |
| | संस्थेच्या इमारती ( ग) | | |
| | रुग्णालये / आरोग्यधाम व शुश्राग्रह ( ग -१) | | |
| १ | १५ पेक्षा कमी उंचीच्या | | |
| | ( एक) १००० चौ. मी.पेक्षा कमी भूखंड क्षेत्राच्या,तळमजला अधिक एक मजला असलेल्या व खाटा नसलेल्या | ४०.०० | ५०,०००/- |
| | ( दोन) १००० चौ. मी.पेक्षा कमी भूखंड क्षेत्राच्या,तळमजला अधिक एक मजला असलेल्या व खाटा असलेल्या | ६०.०० | ७५,०००/- |
| | (तीन) दोन मजल्यापेक्षा अधिक मजले असलेल्या व खाटा नसलेल्या | ७०.०० | १,००,०००/- |
| | (चार ) दोन मजल्यापेक्षा अधिक मजले असलेल्या व खाटा असलेल्या | ८०.०० | १,२५,०००/- |
| २ | १५ ते २४ मीटर उंचीच्या पर्यंत | ९०.०० | ३,००,०००/- |
| ३ | २४ मीटर अधिक उंचीच्या | १२०.०० | ५,००,०००/- |
| | अभिरक्षार्थ ( ग-२) व शिक्षार्थ व प्लेन्टल ( ग-३) | | |
| १ | १५ ते २४ मी. उंची पर्यंत | १००.०० | १.५०,०००/- |
| २ | २४ ते ३०मी. उंची पर्यंत | १२०.०० | २,००,०००/- |
| | समाज मंदिरे ( घ ) | | |
| | ( घ-१ ते घ -५ ) | | |
| १ | १५ ते २४ मी. उंची पर्यंत | ११०.०० | १,७५,०००/- |
| २ | २४ ते ३०मी. उंची पर्यंत | १२५.०० | २,२५,०००/- |
| | व्यावसायिक इमारती ( ड ) | | |
| १ | १५ ते २४ मी. उंची पर्यंत | ८०.०० | १,५०,०००/- |
| २ | २४ मी. वरील उंचीच्या | १००.०० | ३,००,०००/- |
| | वाणिज्यिक इमारती ( च ) | | |
| | ( च-१ व च -५ ) | | |
| १ | १५ ते २४ मी. उंची पर्यंत | ८०.०० | २,००,०००/- |
| २ | २४ ते ३०मी. उंची पर्यंत | १२०.०० | ४,००,०००/- |
| | अति धोक्याच्या ( छ -३) | | |
| १ | ( पाच ) ५०० चौ.मी. पेक्षा अधिक क्षेत्र व्यापलेल्या | १८०.०० | ३,००,०००/- |
| ख ) | धोकादायक वायू व पेट्रोलीयम पदार्थ वाहून नेणारे क्षेत्रपार ( cross country ) नळ मार्ग | २००.०० प्रति मीटर | ५,००,०००/- |
| | गोदामे ( ज ) | | |
| १. | १५ मीटर उंची पर्यंतच्या | | |
| | ( एक ) एक मजली इमारत | ८०.०० | ५०,०००/- |
| | ( दोन ) तळमजला अधिक एक मजला | १००.०० | ७५,०००/- |
| २. | तळमजला अधिक एकाहून अधिक मजले | २५.०० | १,००,०००/- |

२८/१०/२१

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

## परिशिष्ठ " क "

## उदयोग धंदा, व्यवसाय व अन्य सेवा अग्निशमन सेवा शुल्क रचना

| "ब" उद्योगधंदा / व्यवसाय (Business) (वापर ना हरकत दाखले ) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | व्यवसाय प्रकार | | | नाहरकत दाखला शुल्क (प्रतीवर्षी १०% वाढ) | नुतनीकरण शुल्क / वर्ष |
| १ | मंगल कार्यालये / लग्न कार्यालये | | | र.रु २०/- प्रति. चौ.मी. किमान र.रु ३०,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| २ | सिनेमागृहे/ प्रेक्षागृहे/ मल्टीप्लेक्स | | | र.रु २५,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| ३ | धोकादायक पदार्थ ट्रेंडींग दुकाने | | | र.रु ५०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| ५ | धोकादयक गोदामे/स्क्रॅप गोदामे | | | र.रु ८,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| ६ | पेट्रोल पंप (डिझेल, गॅस ई.) | | | र.रु १२,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| ७ | एल.पी.जी गोडावून / एजन्सीज | | | र.रु. १०,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| ८ | एल.पी.जी / सि.एन.जी. रेटिक्युलेशन यंत्रणा (प्रति बँक) - | | | | |
| अ | निवासी इमारती | | | र.रु. ८,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| ब | बिगर निवासी / अथवा मिश्र इमारती | | | र.रु.१५,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| ९ | लाकुड वखार | | | र.रु.३,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| १० | रॉकेल साठा व विक्री - | | | | |
| अ | १००० लिटर. मर्यादा( किरकोळ विक्री ) | | | र.रु.५,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| ब | १००० लिटर ते २५००० लिटर पर्यंत | | | र.रु.१०,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| | टिप : दुकान व रेशन रॉकेल विक्री किरकोळ रॉकेल विक्री म्हणून धरणेत येईल | | | | |
| ११ | हॉटेल | | | | |
| | क्रमांक | क्षेत्रफळ | फक्त हॉटेल | परमीट रुम | नुतनिकरण शुल्क / वर्ष |
| | अ | १० चौ.मी. पर्यंत | र.रु.३,०००/- | र.रु.५,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| | ब | ५० चौ.मी. पर्यंत | र.रु.५,०००/- | र.रु.७,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| | क | १०० चौ.मी. पर्यंत | र.रु.८,०००/- | र.रु.१०,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| | ड | २०० चौ.मी. पर्यंत | र.रु.१०,०००/- | र.रु.१२,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| | इ | २०१ चौ.मी.चे पुढे | र.रु.१२,०००/- | र.रु.१४,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| | फ | स्टार हॉटेल | र.रु.१४,०००/- | र.रु.१६,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| | टिप :<br>● हॉटेल्समध्ये लॉजिगंची सोय असलेस सरसकट र.रु ७,०००/- जादा शुल्क व वार्षिक नुतनीकरण शुल्क हे मुळ शुल्काचे ५०% या प्रमाणे लागू राहील तथापी, एकुण क्षेत्रफळामध्ये पार्किंगच्या जागेचे क्षेत्रफळ वगळून राहील.<br>● फक्त लॉजिंग व्यवसाय असलेल्या व्यावसायीकांना प्रत्येक रुमसाठी अग्निशमन सेवा शुल्क र.रु ५००/- या प्रमाणे आकारणेत येईल व वार्षिक नुतनीकरणासाठी मुळ शुल्काचे ५०% रक्कम आकारणेत येईल. | | | | |
| १२ | सायबर कॅफे | | | र.रु.३,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| १३ | शॉपिंग मॉल्स | | | र.रु.२५,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| १४ | हॉस्पीटल (२० बेड्सवरील फक्त) - | | | | |
| अ | २० ते ५० बेड्स पर्यंत | | | र.रु. १२,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| ब | ५१ ते १०० बेड्स पर्यंत | | | र.रु.१५,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| क | १०१ बेड्स पेक्षा अधिक | | | र.रु.२०/- प्रति बेड | मुळ शुल्काचे ५० % |
| १५ | शाळा (खाजगी)<br>**(School Safety Certificate)** | | | र.रु.१५,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| | मनपा / शासकिय शाळा | | | निंरक | निंरक |
| १६ | व्यवसाय वाहनतळ इमारत | | | र.रु.२०,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | कंपनी / कारखाने - | | | |
| अ. | वर्कशॉप (कामगार संख्या ५) | | र.रु.५,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| ब. | प्रा.लि.SSI,एन्टरप्राईज्स (कामगार संख्या अट नाही) | | र.रु. ८,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| क. | लिमिटेड कंपनी | | र.रु.१०,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| ड. | MAH.,धोकादायक कंपन्या | | र.रु.१५,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| ई. | मल्टीनॅशनल कंपन्या | | र.रु.२०,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| अ.क्र. | तपशिल | | ना हरकत दाखला शुल्क | नुतनीकरण शुल्क/ वर्ष |
| १८ | फटाका स्टॉल दुकाने - | | | |
| अ | दिपावली हंगामी फटाके विक्रीस्टॉल | | र.रु.१,०००/- | लागु नाही |
| ब | कायमस्वरुपी फटाकादुकान | | र.रु.१०,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| १९ | ऑटो मोबाईल शोरूम व सर्व्हीस सेंटर - | | | |
| | | दुचाकी | इतर | |
| अ | ५०० चौ.मी. पर्यंत | र.रु १०,०००/- | र.रु १२,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| ब | ५०१ चौ.मी. पुढे | र.रु १५,०००/- | र.रु १७,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| | टिप – ज्या व्यावसायिकांचे शोरुम व सर्व्हीस स्टेशन वेगवेगळया ठिकाणी असतील त्यांनी दोन्ही करीता स्वतंत्र ना हरकत दाखले घेणे जरूरीचे आहे. | | | |
| २० | स्पोर्टस् कॉम्प्लेक्स | | र.रु ८,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| २१ | खेळणी, मनोरंजन( कमाल १ महिना करीता) | | र.रु १५,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| २२ | अन्य व्यवसाय / उद्योगधंदा / वापर | | र.रु ८,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |

" क " अन्य सेवा

| अ.क्र. | तपशिल | ना हरकत दाखला शुल्क | नुतनीकरण शुल्क/ वर्ष |
|---|---|---|---|
| २३ | कच्चे बांधकाम / तात्पूरता वापर | | |
| अ | सर्कस | र.रु ५० /- प्रति दिन | लागु नाही |
| ब | प्रदर्शन (कार्यक्रम शामियाना) | र.रु १,००० /- प्रति दिन | लागू नाही |
| | टिप : फक्त मनपा आयोजित बचत गट, प्रदर्शने व इतर तात्पुरत्या बांधकामांना सेवा शुल्क लागू नाही. | | |
| २४ | स्टँड बाय डयुटी (आगाऊ रक्कम भरणे)- | | |
| अ | मनपा हद्दित (प्रति वाहन, प्रति शिफ्ट, जनरल ड्युटी ) | र.रु ५०००/- | लागू नाही |
| ब | मनपा हद्दिबाहेर (प्रति वाहन, प्रति शिफ्ट ) | | लागू नाही |
| | ५० कि. मी. पर्यंत | र.रु ८०००/- | लागू नाही |
| | ५० कि. मी. च्या पुढे | र.रु १०,०००/- | लागू नाही |
| २५ | पाणी फवारणी / पंपींग चार्ज - | | |
| अ | मनपा हद्दिमध्ये | र.रु ५,०००/- | लागू नाही |
| ब | मनपा हद्दिबाहेर ( १०कि.मी. पर्यंत) | र.रु १०,०००/- | लागू नाही |
| २६ | प्रशिक्षण / प्रात्यक्षिके (कमाल १.५ तास ) - | | |
| अ | सरकारी संस्था | र.रु १५००/ | लागू नाही |
| ब | खाजगी संस्था | र.रु २०००/ | लागू नाही |
| क | खाजगी शाळा | र.रु २०००/ | लागू नाही |
| | टिप : अग्निशामक केंद्रामध्ये शाळा, संस्था भेट यांना एक सत्र करीता प्रशिक्षण शुल्क लागू राहणार नाही. | | |
| २७ | मनपा हद्दी बाहेर फायर / रेस्क्यु वर्दी - | | |
| अ | निवासी आगी | र.रु ५०००/- (सरसकट) | लागू नाही |
| ब | बिगर निवासी आगी | र.रु ८०००/-(सरसकट) | लागू नाही |
| क | वाहन आगी - | | |
| | दोन वा तीनचाकी | र.रु २०००/- (सरसकट) | लागू नाही |
| | चार चाकी ( हलके ) | र.रु ४०००/- (सरसकट) | लागू नाही |
| | चार चाकी ( जड ) | र.रु ६०००/- (सरसकट) | लागू नाही |

| | | | |
|---|---|---|---|
| २८ | अग्निशामक वर्दी पुर्तता प्रमाणपत्र - | | |
| अ | झोपडी (फोटो पास असल्यास मोफत) | र.रु ७००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| ब | निवासी | र.रु १,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| क | दुकाने | र.रु ३,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| ड | वर्कशॉप, लघुउद्योग, SSI,एन्टरप्राईज्स, गॅरेज. | र.रु ५,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| इ | MAH. कंपनी, गोदामे, वाहन शो-रुम | र.रु ८,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| फ | प्रा.लि. मर्यादित कंपन्या | र.रु १०,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| ग | दुचाकी वाहन | र.रु २,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| (i) | तीन चाकी वाहन | र.रु ३,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| (ii) | चार चाकी वाहन ( हलके ) | र.रु ५,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| (iii) | चार चाकी वाहन ( अवजड ) | र.रु ६,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| च | हॉटेलस् - | | |
| (i) | " सी " ग्रेड खालील | र.रु २,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| (ii) | " सी " ग्रेड | र.रु ४,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| (iii) | " बी " ग्रेड | र.रु ६,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| (iv) | " ए " ग्रेड | र.रु ८,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| (v) | स्टार हॉटेल्स (सर्व प्रकारचे ) | र.रु १०,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |

टिप :

१) ना हरकत दाखला मुदत संपल्याचे एका महिन्यानंतर, नुतनीकरण शुल्कावर विलंब आकार १०% प्रति महा.

२) मनपा हद्दीमधील पिंपरी चिंचवड नवनगर प्राधिकरण क्षेत्रातील उद्योगधंदा व्यवसाय यांनाही सदर ना हरकत दाखले घेणे आवश्यक आहे.

३) मनपा हद्दी बाहेरील अग्निशमन वर्दी पुर्तता प्रमाणपत्राकरीता दुप्पट शुल्क आकारणेत येईल.

४) सदर शुल्क मनपाच्या अग्निसुरक्षा निधी या स्वतंत्र लेखा शिर्षामध्ये जमा करण्यात येतील. (महाराष्ट्र आग व जीव सुरक्षा अधिनियम, २००६, चे कमल २५(१))

५) सदर शुल्क जमा रक्कम ही महाराष्ट्र आग व सुरक्षा अधिनियम २००६ चे कलम २५(३) नुसार फक्त मनपा अग्निशामक दलाचे केंद्र, वाहने, उपकरणे, साहित्य खरेदी करीता खर्च करण्यात येईल.

६) एकदा भरलेले शुल्क परत केले जाणार नाही. जादा शुल्क असल्यास फक्त परतावा अनुज्ञेय राहील. भरलेले शुल्क संबंधीत विकसक / बिल्डर यांची मनपा हद्दीमध्ये अन्य बांधकामाचे ठिकाणी अनुज्ञेय राहील.

७) मनपा हद्दीमधील एम.आय.डी.सी. क्षेत्राकरीता अग्निशामक ना हरकत दाखला लागू राहणार नाही.

८) जर एखाद्याने उक्त ना हरकत दाखला नियामाप्रमाणे घेणे आवश्यक असताना तसा सदरचा पुर्ण दाखला घेतला असेल. उदा. इमारत उंची प्रमाणे अनुज्ञेय ई. अशावेळेस तदनंतर नव्याने दुरूस्त दाखला देणेकामी संबंधीताकडुन दाखल्याची होणारी रक्कम दुप्पट दराने आकारणेत येईल.

९) उंची मधील " ० " चा अर्थ जमीनीपासुन (Ground Level & Avg Ground Level ) धरणेत येईल

१०) निवासी इमारती प्लॅन मंजूरी अग्निशामक ना हरकत दाखला, हा केवळ संपुर्ण निवासी वापराच्या ज्यांची जमिनीपासुन उंची (शेवटच्या स्लॅब पर्यंत) १५ मीटर व त्यापेक्षा अधिक आहे.

११) बिगर निवासी इमारती (क्र.३) मध्ये N.B.C. -२००५, पार्ट IV, Clause 3.1.1 प्रमाणे निवासी इमारती वगळता अन्य सर्व प्रकार (गट) इमारती यामध्ये समाविष्ट आहेत. (उदा. Hotel, Hospital, Mercantile, Industrial, Business, Storage, Educational, Assembly, Hazardous, Etc) सदर इमारतीची उंची १५ मीटर पेक्षा कमी किंवा अधिक परंतु बिगरनिवासी क्षेत्रफळ हे ५०० चौ. मीटर पेक्षा अधिक असणे आवश्यक

१२) इमारतींना अग्नि नाहरकत दाखल्याकरीता उक्त दर हे एकुण बांधकामाच्या Gross Built-up area वर लागू राहील.

१३) उंच, निवासी + बिगर निवासी (Mix Occupancy ) इमारतीमध्ये ५०० चौ.मी. व त्यापेक्षा जास्त बिगर निवासी बांधकाम असल्यास सदर इमारत मिश्र इमारतीमध्ये धरणेत येईल.

१४) शुल्कांकरीता इमारतीची उंची जमीनी पासून (From Ground Level) शेवटच्या पॅरापेट वॉल (Terrace Parapet Wall) पर्यंत मोजली जाईल.

१५) मनपा/केंद्र/राज्य/शासकिय/प्राधिकरण मिळकती(इमारतीं) करीता अग्नि सेवा शुल्क लागू नाही. तथापी,BOT/PPP वा इतर कोणत्याही प्रकारच्या बांधकामांकरीता अग्नि सेवा शुल्क लागू राहील. (महाराष्ट्र फायर ऍक्ट कलम १५अन्वये)

१६) वार्षिक फि, एकुण शुल्काच्या १% जादा आकारणेत येईल. (महाराष्ट्र फायर ऍक्ट कलम १३(१)अन्वये)

१७) केंद्र शासन, राज्य शासन, अथवा महपालिकेने केलेले या संदर्भातील उपविधी, नियम, अधिनियम ई. वेळोवेळी लागू होतील.

१८) प्लॅन मंजूरी प्राथमिक ना हरकत दाखला (Provisional Fire NOC) घेतली असल्यास, सदर प्लॅनमध्ये वाढीव क्षेत्रफळ ५०० चौ.मी.पेक्षा जास्त बदल, इमारतीचे उंचीमध्ये ना हरकत दाखला शुल्क दराच्या स्लॅब बदलत असल्यास, वापर ( Occupancy) बदल असल्यास त्याकरीता सुधारीत ना हरकत दखला (Revised Fire NOC ) घेणे अनुज्ञेय राहील.

१९) एकदा अग्निशामक तात्पुरता ना हरकत दाखला घेतल्यानंतर ५०० चौ. मी. आतील वाढीव बांधकामाचे इमारतीकरीता पुनश्च सुधारीत अग्निशामक ना हकरत दाखला घेण्याची अवश्यकता नाही. अशा बांधकामांना अंतिम ना हरकत दाखला पुनश्च घ्यावयाचा असल्यास तो थेट अनुज्ञेय राहील.

22/10/21

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८